SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

विद्यार्थी विकास विभाग

Dr. T. M. Chougale
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/121 दि. 11 AUG 2025

प्रती,

**मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : Anti Ragging Week च्या अनुषंगाने विविध स्पर्धाचे आयोजन केलेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात यु.जी.सी. मार्फत दि. १२ ऑगस्ट **Anti Ragging Day** हा **Anti Ragging Week** म्हणून दि. १२ ऑगस्ट ते दि. १८ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत साजरा करणेबाबत कळवण्यात आले आहे. विद्यार्थ्यामध्ये Ragging विरुद्ध जाणीवजागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे व या अनुषंगाने विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कळवण्यात आले आहे. त्यानुसार या विभागामार्फत पोस्टर मेकिंग स्पर्धा व निबंध स्पर्धा (मराठी/हिंदी/इंग्रजी) आयोजित करण्यात येत आहेत.

१. पोस्टर मेकिंग स्पर्धा दि. १४/०८/२०२५ रोजी संगीत व नाटयशास्त्र अधिविभागामध्ये आयोजित करण्यात येणार आहेत व पोस्टर मेकिंग स्पर्धा भाग घेण्यासाठी दि. १३/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे नावे नोंदविणे आवश्यक आहे.
२. निबंध स्पर्धेसाठी दि. १८/०८/२०२५ पर्यंत खाली दिलेल्या विषयावर निबंध तयार करुन विद्यार्थी विद्यार्थी विकास विभागात जमा करावयाचे आहेत.

सोबत दोन्ही स्पर्धांच नियमावली जोडली आहे. तरी सदर दोन्ही स्पर्धेमध्ये आपल्या अधिविभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे तसचे सदरचे पत्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव व माहितीसाठी सुचना फलकावर लावावे. हि विनंती.

**निबंध स्पर्धेसाठीचे विषय :**

१. रॅगिंगचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर होणारे दुष्परिणाम
२. रॅगिंगमुक्त शैक्षणिक परिसर : धोरणे उपाययोजना

कळावे,

आपला विश्वासू

11/8/25

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत : नियमावली जोडली आहे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## Anti Ragging Week

## पोस्टर मेकिंग स्पर्धा नियमावली

यु.जी.सी. ने दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा Anti Ragging Week म्हणून दि. १२ ऑगस्ट, २०२५ ते दि १८ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत साजरा करावयाचे ठरवले आहे. Ragging विरुध्द जाणीव जागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पोस्टर मेकिंग स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे नावे नोंदवावी. व **स्पर्धेकरीता दि. १४ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग येथे उपस्थित रहावे.**

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.
२. स्पर्धेसाठी एका अधिविभागातील कितीही स्पर्धकांना भाग घेता येईल.
३. स्पर्धकास संगीत व नाटशास्त्र अधिविभाग येथे जागेवर बसून पोस्टर तयार करावयाचे आहे.
४. **पोस्टर स्पर्धेसाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावयाचे आहे.** संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.
५. पोस्टरचा आकार २२'' X १५'' असेल.
६. प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल.
७. पोस्टरसाठी कोणत्याही प्रकारचे ऑईल, वॉटर, पेस्टल इ. रंग वापरता येतील.
८. तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या प्रथम तीन क्रमांकांनाच प्रमाणपत्र व रोख रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.
९. सर्व सहभागी स्पर्धेकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.
१०. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.
११. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.
१२. पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परीक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल.
१३. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

**टिप: पोस्टर मेकिंग स्पर्धेत भाग घेण्यासाठी दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे नावे नोंदविणे आवश्यक आहे.**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग
## Anti Ragging Week
### निबंध स्पर्धा नियमावली

यु.जी.सी. ने दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा Anti Ragging Week म्हणून दि. १२ ऑगस्ट, २०२५ ते दि १८ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत साजरा करावयाचे ठरवले आहे. Ragging विरुध्द जाणीव जागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्‌देश आहे. त्या अनुषंगाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. १८ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे खाली दिलेल्या विषयावर निबंध तयार करुन जमा करावयाचे आहे.

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.
२. स्पर्धेसाठी एका अधिविभागातील कितीही स्पर्धकांना भाग घेता येईल.
३. निबंधासाठी शब्द मर्यादा १००० ते १२०० शब्दांची असेल.
४. निबंध लेखनाची भाषा मराठी, हिंदी, इंग्रजी यापैकी एक राहिल.
५. निबंध लिहिताना स्वत:ची संकल्पना स्वहस्ताक्षरामध्ये मांडणे आवश्यक आहे.
६. **निबंधामध्ये इतरांची संकल्प अथवा इतरांचे लेखन घेता येणार नाही यांची नोद घ्यावी.**
७. तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेमध्ये प्रथम तीन क्रमांकांनाच प्रमाणपत्र व रोख रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.
८. सर्व सहभागी स्पर्धेकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.
९. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.
१०. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.
११. निबंध स्पर्धेचे परीक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल.
१२. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

**निबंध स्पर्धेसाठीचे विषय :**

**१. रॅगिंगचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर होणारे दुष्परिणाम**
**२. रॅगिंगमुक्त शैक्षणिक परिसर: धोरणे उपाययोजना**

टिप: निबंध स्पर्धेसाठी दि. १८ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत निबंध तयार करुन विद्यार्थी विकास विभागात जमा करावयाचे आहेत.